# <u>अटल अर्थसहाय्य योजना</u>

## <u>प्रकल्प मंजुरीनंतर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी करावयाच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन सुचना</u>

**संदर्भ :** शासन निर्णय सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,शासन निर्णय क्रं.संकीर्ण-1018/प्र. क्र. 126/18- स दिनांक 02 जानेवारी 2019.

संदर्भीय शासन निर्णयान्वये सहकारी संस्थासाठी अटल अर्थसहाय्य योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये विशेषत: नविन सहकारी संस्थांना कृषि, कृषि पुरक व बिगर कृषि नाविन्य पुर्ण उदयोगांवर आधारीत प्रकल्पांना प्रोत्साहन देवुन सहकारी संस्थाच्या व्यवसाय वृध्दीसाठी अर्थसाहय देण्यासाठी ही योजना शासनाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सदर योजनेची अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणुन महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या, पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अटल अर्थसहाय्य योजनेचे संबंधित संस्थेच्या प्रकल्पास राज्यस्तरीय समितीने मंजूरी दिल्यानंतर संबंधित जिल्हा उपनिबंधक व इतर अधिका-यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

राज्यस्तरीय समितीने मंजूरी दिलेल्या लाभार्थी संस्थेकडून मंजुर प्रकल्प किंमतीच्या स्वहिश्याची १२.५०% रक्कम खर्च होताच सदर संस्था कर्जमागणी प्रस्ताव व इतर कागदपत्रे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दाखल केल्यानंतर संबंधित जिल्हा उपनिबंधक व इतर अधिका-यांनी सदर प्रस्ताव परिपुर्ण असल्यास झालेल्या कामाची मोका तपासणी खालील प्रमाणे करावी.

**अ) प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया उदयोग (कृषि पुरक व इतर) किंवा कोणत्याही प्रकारची मशिनरीचा समावेश असणारे प्रकल्प**

III. उपरोक्त प्रकारच्या प्रकल्पामध्ये असणा-या प्रकल्प किंमती मध्ये 100% मशिनरीचा समावेश असल्यास संस्थेकडे उपलब्ध असलेले शेड/ गाळा हे किमान 15वर्षा करीता नोंदणीकृत भाडेपटटा करार (Registered Lease Agreement) असलेले किंवा स्वत: संस्थेच्या मालकीचे असल्याची खात्री करावी.

3. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने वस्तु व सेवा यांच्या संपादनाची प्रक्रिया पार पाडताना संबंधित संस्थेने सहकारी संस्था अधिनियम 1960 व अधिनियम 1961 नुसार संबंधित शासन निर्णय, परिपत्रके

यांचे पालन केले असलेबाबत व सदर संपादन प्रक्रिया पारदर्शक व स्पर्धात्मक असलेबाबत संबंधित निबंधकांनी दक्षता घ्यावी.

4. मशिनरी खरेदीसाठी संस्थेने दिलेले पुरवठा आदेश, अग्रीम रक्कमेचा तपशील, संस्थेचे बँक स्टेटमेंट, मशिनरी पुरवठादाराचे अग्रीम मिळालेबाबतची पावती (Payment Receipts), देयके इत्यादीची कागदपत्रे यांची खातरजमा करावी.

IV. उपरोक्त प्रकल्प किंमतीमध्ये जर बांधकाम व मशिनरीचा समावेश असल्यास प्रथम जागेचा नोंदणीकृत भाडेपटटा करार संस्थेच्या / मालकीची असल्याचे उपरोक्त प्रमाणे खात्री करावी. यामध्ये सहकारी संस्थेस स्वहिस्सा हा प्रथमत: प्रकल्प अहवालामध्ये नमुद बांधकामावर / मशिनरी खरेदी / मशीनरी पुरवठादारास दिलेला आग्रीम या पद्धतीने खर्च करावा लागेल.

4. संस्थेने बांधकाम करताना प्रकल्प अहवालात नमुद अंदाजपत्रकानुसार कामे सुरू करावीत. यामध्ये बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, विटा, स्टील, पत्रा इत्यादी साहित्य प्रकल्प उभारणीस्थळी उपलब्ध असल्यास त्या संबंधीचा खर्च ग्राहय धरण्यात येईल. याकरीता संबंधीत जिल्हयाच्या DSR ला प्रमाण मानावे.

5. तपासणी अधिकारी हे झालेल्या कामाची नोंद घेतील. फोटो, देयके संस्थेचे बँक स्टेटमेंट व उभारलेली सुविधा यांची मोका तपासणी करतील.

**ब) गोदाम/ इतर स्थावर मालमत्ता उभारणी असणारे प्रकल्प**

6. वरील प्रकल्पामध्ये शेतमाल व इतर मालाच्या साठवणुकीसाठी गोदाम उभारणीचा समावेश असेलेले तसेच मंगल कार्यालय उभारणी, प्रशिक्षण केंद्र उभारणी , कॅटल शेड, कोल्ड स्टोरेज यासारख्या प्रकल्पांचा समावेश असेल.

7. अशा प्रकल्पांची मोका तपासणी करताना प्रामुख्याने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या जागेची खात्री करण्यात यावी. सदर जागा ही स्वत: संस्थेच्या मालकीची किंवा किमान 15 वर्षा करीता भाडेपटटा करार (Registered Lease Agreement) करण्यात आलेली असावी.

8. उपरोक्त प्रकल्पामध्ये सहकारी संस्थेने प्राधान्याने स्वहिस्सा हा प्रकल्पामध्ये नमुद बांधकामावरच खर्च करावा लागेल. संस्थेने प्रकल्प अहवालात नमुद बांधकामाची अंदाजपत्रकानुसार कामे सुरू करावीत. यामध्ये बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, विटा, स्टील, पत्रा इत्यादी साहित्य प्रकल्प उभारणीस्थळी उपलब्ध असल्यास त्यासंबंधीचा खर्च ग्राहय धरण्यात येईल. याकरिता संबंधीत जिल्हयाच्या DSR ला प्रमाण मानावे.

9. तपासणी अधिकारी हे झालेल्या कामाची नोंद घेतील आणि तसेच फोटो, बीले, संस्थेचे बँक स्टेटमेंट व उभारलेली सुविधा यांची मोका तपासणी करतील.

**क) वाहतुक व्यवस्थापन व औजारे बँक**

5. उपरोक्त प्रकल्पामध्ये अटल अर्थसहाय्य योजनेतंर्गत वाहतुक वाहन / मोबाईल रिटेल व्हॅन, ट्रॅक्टर, जेसीबी, टेम्पो, ट्रक, औजारे इ. बँक अशा प्रकारच्या प्रकल्पांचा समावेश असेल अशा प्रकल्पामध्ये सहकारी संस्था वाहन खरेदीसाठी स्वहिस्सा रक्कम सदर पुरवठादारास अग्रीम स्वरूपात देईल.यामध्ये वाहन खरेदीसाठी / औजारे बँक खरेदीसाठी सहकारी संस्थेने पुरवठादारास दिलेला आग्रीमाचा खर्च ग्राहय धरण्यात येईल.
6. वाहन खरेदीबाबतीत संस्थेस उपविक्रेता (Sub Dealer) यांचेकडून वाहन खरेदी करता येणार नाही. त्यामुळे याबाबत खात्री करावी.
7. संबंधित मोका तपासणी अधिकारी संस्थेने वाहन खरेदीसाठी पुरवठादारास दिलेले पुरवठा आदेश तसेच दिलेल्या अग्रीम रक्कमेचा तपशील, संस्थेचे बँक स्टेटमेंट, वाहन पुरवठादाराचे अग्रीम मिळालेबाबतची पावती (Payment Receipt), देयके इत्यादींची तपासणी करतील.

**ड) सहकारी रिटेल शॉप**

7. उपरोक्त प्रकल्पामध्ये सहकारी संस्थेच्या कॉप शॉप, कृषि सेवा केंद्र, ग्राहक भांडार इत्यादी प्रकारच्या व्यवसायांचा समावेश असेल. यामध्ये प्रामुख्याने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या जागेची खात्री करण्यात यावी. सदर जागा / गाळा हे स्वत: संस्थेच्या मालकीची किंवा किमान 15 वर्षा करीता नोंदणीकृत भाडेपटटा करार (Registered Lease Agreement) करण्यात आलेली असावी.
8. प्रकल्प किंमतीमधील खेळतेभांडवलाचा किंवा कॉप शॉप मधील विक्रीसाठी ठेवण्यात येणा-या मालाची खरेदी रक्कमेचा समावेश या योजनेतील कर्ज व अनुदान रक्कमेमध्ये केला जाणार नाही.
9. सदर प्रकल्पामध्ये नमुद बाबींप्रमाणे संबंधित सहकारी संस्थेने कामे सुरू करावीत. या मध्ये प्रामुख्याने शॉपचे बांधकाम असल्यास प्रथम बांधकाम सुरू करणे बंधनकारक आहे. त्यानुसार संस्थेने स्वनिधी याबाबीवरच खर्च करावा. यामध्ये बांधकामासाठी आवश्यक सिमेंट, वाळू, विटा, स्टील, पत्रा इत्यादी साहित्य प्रकल्प उभारणीस्थळी उपलब्ध असल्यास त्यासंबंधीचा खर्च ग्राहय धरण्यात येईल.

10. यानंतर संबंधित मोका तपासणी अधिकारी शॉपचे सुरू झालेले काम, देयके, कामाच्या नोंदी, संस्थेचे बँक स्टेटमेंट, फोटो इत्यादी तपासणी करतील.
11. जर या प्रकल्पामध्ये फक्त कॉपशॉपसाठी आवश्यक साहित्याचा समावेश असेल तर फर्निचर साहित्य, कॉम्पुटर, लॅपटॉप, प्रिंटिंर इत्यादी खरेदीची तपासणी करण्यात यावी. यामध्ये संस्थेने पुरवठादारास दिलेला पुरवठा आदेश व रक्कमेचा तपशील, संस्थेचे बँकेचे स्टेटमेंट व संबंधीत पुरवठादाराकडून पैसे मिळाल्याच्या पावत्या इत्यादीची तपासणी करण्यात येईल आणि संबंधित सहकारी संस्थेची स्वहिस्सा रक्कम खर्च झाल्याचे ग्राहय धरण्यात येईल.

## मोका तपासणी करतेवेळी सर्वसाधारण सुचना

वरील सर्व प्रकल्पांची मोका तपासणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या स्तरावर करण्यात येईल.

**मोका तपासणी / Pre Sanction Visit for Loan Proposal**

1. सर्व मोका तपासणी अहवालावर संबंधित जिल्हा उपनिबंधक यांनी स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.
2. संबंधित विभागीय सहनिबंधक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्हयातील किमान दोन संस्थांच्या मोका तपासणीस सहभागी व्हावे व त्या अहवालावर प्रतिस्वाक्षरी करावी.
3. मोका तपासणी करावयाचे प्रपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे. त्याच प्रपत्रात मुळ अहवाल महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाकडे सादर करावा व एक प्रत संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे जतन करावी.
4. मोका तपासणीवेळी संस्थेने सादर केलेल्या देयकावरील संबंधित पुरवठादाराचा GST Number तपासुन घेण्यासाठी Google वरील https://services.gst.gov.in या वेबसाईट वर जाऊन Search Tax Payer या Link वर संबंधित पुरवठादाराचा GST Number टाकल्यास त्या संबंधित पुरवठादाराची सर्व माहिती उपलब्ध होते यावरुन पुरवठादाराचा GST Number योग्य असल्याची खात्री करता येते.
5. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत तयार करण्यात येणा-या MIS मध्ये माहीती व फोटो संबंधित तपसणी अधिका-यांकडून Upload करण्यात यावेत.
6. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या वार्षिक तपासणी कार्यक्रमात सदर योजनेतील अर्थसहाय्यीत प्रकल्पांचा प्राधान्याने समावेश करावा.

**7.** मोका तपासणीचे फोटो हे Android Mobile मधील Play Store वरील उपलब्ध असलेले Note Cam App किंवा तत्सम App Download करून त्याद्वारे काढण्यात यावेत जेणेकरून Longitude व Latitude तसेच फोटो काढल्याचा दिनांक, वेळ इत्यादी तपशील उपलब्ध होईल. मोका तपासणीच्या फोटो मध्ये खालील बाबींचा समावेश असावा.

अ. मोका तपासणी फोटो घेतेवेळी तपासणी अधिका-यासमवेत प्रकल्पाचा नामफलक व संबंधित सहकारी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित असतील याची नोंद घ्यावी.

ब. फोटो मध्ये प्रकल्प उभारणीच्या झालेल्या बांधकामाचा / बांधकाम साहित्याचा समावेश असावा.

क. मशिनरी बाबतीमध्ये मशिनरी व मशिनरी करीता उपलब्ध असलेल्या शेडचा पुर्ण शेड दिसेल असा फोटो असावा.

ड. प्रकल्प उभारणीच्या जागेचे सर्वकश अंदाज येईल असे तीन ते चार फोटो असावेत आणि सदर फोटो हे तपासणी अधिका-याने प्रमाणित केलेले असावेत.

8.सहकारी संस्थांनी स्वहिस्सा खर्च झाल्यानंतर प्रकल्पासाठी मंजूर प्रकल्प किंमतीच्या 12.50% कर्जाची मागणी संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे विहित प्रपत्रात करावी.

9. तद्‌नंतर जिल्हा उपनिबंधक यांनी मोका तपासणी करावी.

10. संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी सदर मागणी प्रस्तावांची छाननी करून सदर मुळ मोका तपासणी अहवाल व मुळ कर्ज प्रस्ताव महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाकडे सादर करावा व त्याची एक प्रत आपल्या कार्यालयात जतन करावी.

11. राज्यस्तरावर प्रस्तावांची महामंडळामार्फत तपासणी करण्यात येईल व परिपुर्ण कर्जाचे प्रस्तावास महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत कर्जमंजुरीसाठी आवश्यक सर्व अटी व शर्तीच्या आधीन राहुन मंजुरी देण्यात येईल आणि संबंधित सहकारी संस्थास शासन निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत कर्जाचे वितरण करण्यात येईल.

12. या मागदर्शक सुचनांमधील बाबींच्या पुर्ततेबरोबरच योजनेअंतर्गत जिल्हा उपनिबंधकांना दिलेल्या मंजूरी पत्रामधील तसेच सहकारी संस्थांनी करावयच्या कार्यवाहीबाबतच्या मार्गदर्शक सुचनामधील सर्व मुद्यांची पुर्तता झालेली असल्याबाबत देखील खातरजमा करण्यात यावी.

*******************************************************

# मोका तपासणी अहवाल

## महाराष्ट्र सहकार विकास महामंडळातंर्गत अटल अर्थसहाय्य योजनेतील मंजूर कृषि / बिगर कृषि आधारीत प्रकल्पांना कर्जवितरीत करण्यासाठी मोका तपासणी अहवाल/

## Loan Pre Sanction Visit Report

1. लाभार्थी संस्थेचे नांव:-

पत्ता :- गाव:-

तालुका:- जिल्हा:-

पिनकोड:- फोन नंबर:-

ईमेलचा पत्ता:-

2. चेअरमन व सचिवाचे नाव व संपर्क क्रमांक:-

| **चेअरमनचे नाव** | **मोबाईल नं** | **सचिवाचे नाव** | **मोबाईल नं** |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

3. संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक:-

4. सहकारी संस्थेचा बँकतपशील:-

| | |
|---|---|
| खाते क्रं. | |
| बँकेचे नाव | |
| शाखेचे नाव | |
| आयएफएससी (IFSC) कोड | |

5. प्रकल्पाचा प्रकार:-

कृषि / बिगर कृषि प्रकल्पाची माहिती

6. सहकारी संस्थेकडे असलेल्या विविध परवान्याची माहिती:-

| **अ.क्रं.** | **परवाना तपशील (License)** | **नोंदणी क्रमांक** | **दिनांक** | **परवाना कालावधी (वर्ष)** |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |

7. प्रकल्प उभारणी केंद्राचा सविस्तर पत्ता व सर्वे नं.:-

- जागा भाडे पटटा करार / संस्थेच्या मालकीची:-..............................................
- प्रकल्पाची जागा मुख्य रस्त्यालगत आहे किंवा नाही ?...........................
- रेल्वेस्टेशन पासून प्रकल्पाचे अंतर :-.........................................................किमी.
- स्थानिक बाजरपेठेपासून प्रकल्पाचे अंतर :-.........................................................किमी.

- इतर नजिकच्या मोठया बाजरपेठेपासून प्रकल्पाचे अंतर :-..................................................किमी.
- प्रकल्प उभारणीच्या ठिकाणी विदयुत सेवा उपलब्ध आहे किंवा नाही ?.................................
- प्रकल्प उभारणीच्या ठिकाणी पाण्याची सोय आहे किंवा नाही ?.................................
- प्रकल्पासाठी आवश्यक असणारी कच्चा मालाची सुविधा आहे किंवा नाही?....................

8. प्रकल्प उभारणी सुरू केल्याचा दिनांक:-

9. प्रकल्प मंजूरी व प्रकल्प किंमतीचा तपशील- प्रकल्प मंजूरी आदेश जा. क्र. :-

प्रकल्प मंजूरी दिनांक .............................................

प्रकल्प एकूण किंमत रु .......................................... लाख

प्रकल्प मंजुर अनुदान रक्कम रु.............................. लाख

प्रकल्प कर्ज रक्कम रु..............................................लाख

सहकारी संस्थेचा स्वहिस्सा रक्कम रु........................ लाख

10. प्रकल्प उभारणी पूर्ण केल्याचा दिनांक (लागू असल्यास):-
11. प्रकल्पाची क्षमता (मे. टन/ दिन ज्या त्या प्रकल्पाच्या प्रकारानुसार परिमाण बदलेल):-

12. प्रकल्पातील प्रस्तावित करण्यात आलेल्या सुविधांचा तपशील

**अ) प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया उदयोग (कृषि पुरक व इतर) किंवा कोणत्याही प्रकारची मशिनरीचा समावेश असणारे प्रकल्प** (उदा. धान्य स्वच्छता प्रतवारी यंत्र, दाल मिल, ऑईल मिल, आटा मिल, इ.)

| अ.क्र | बाब | प्रकल्प अहवालानुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या सुविधा | मोका तपासणी वेळी प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधा | साहित्याचा तपशील | प्रत्यक्षात झालेला खर्च रक्कम (रु.) | प्रकल्प अहवालानुसार पात्र खर्च रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | बांधकाम<br>(चौ.फुट. रु.)<br>अ. क्षेत्रफळ<br>ब. बांधकाम खर्च | | | 1.सिमेंट...............नग<br>2.वाळू................ब्रास<br>3.स्टील..............किलो<br>4.पत्रे..........किलो/ नग<br>5.खडी,मुरूम........ब्रास<br>6.इत्यादी | | |
| 2. | मशिनरी यादी तपशीलासह (नग)<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | | | (मशिन क्षमता)<br>(कंपनीचे नाव)<br>(Date of Manufacturing) | | |
| **एकूण** | | | | | | |

**ब) गोदाम/ इतर स्थावर मालमत्ता उभारणी असणारे प्रकल्प** (उदा. गोदाम, कोल्ड स्टोरेज, प्रशिक्षण केंद्र, मंगल कार्यालय, कॅटल शेड इ.)

| अ.क्र. | बाब | प्रकल्प अहवालानुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या सुविधा | मोका तपासणी वेळी प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधा | साहित्याचा तपशील | प्रत्यक्षात झालेला खर्च रु. | प्रकल्प अहवालानुसार पात्र खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | बांधकाम<br>(चौ.फुट. रु.)<br>अ. क्षेत्रफळ<br>ब. बांधकाम खर्च | | | 1.सिमेंट...............नग<br>2.वाळू................ब्रास<br>3.स्टील..............किलो<br>4.पत्रे..........किलो/ नग<br>5.खडी,मुरूम........ब्रास<br>6. इत्यादी | | |
| **एकूण** | | | | | | |

**क) वाहतुक व्यवस्थापन व औजारे बँक**(उदा. प्रवासी बस,रेफर व्हॅन, मोबाईल रिटेल व्हॅन, ट्रॅक्टर व ट्रॅक्टर चलीत औजारे, टेम्पो, ट्रक इ.)

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्रकल्प अहवालानुसार प्रस्तावित करण्यात आलेल्या वाहनाचा/ औजाराचा प्रकार | मोका तपासणी वेळी प्रत्यक्षात नोंद करण्यात आलेल्या वाहनाचा तपशील | प्रकल्प अहवालानुसार पात्र खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वाहनाचा तपशील<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | नग | | उदा.<br>पिकप व्हॅन......... टन क्षमता,<br>प्रवासी वाहन............ आसनी,<br>ट्रकटर.......एचपी इत्यादी.<br>(कंपनीचे नाव)<br>(वाहनाचा प्रकार) | |
| **एकूण** | | | | | |

**ड) सहकारी रिटेल शॉप** (उदा. ग्राहक भांडार, कॉप शॉ ाप, कृषि सेवा केंद्र, इ.)

| अ. क्र. | बाब | प्रस्तावित करण्यात आलेल्या सुविधा | मोका तपासणी वेळी प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधा | साहित्याचा तपशील | प्रत्यक्षात झालेला खर्च रु. | अनुदानास पात्र खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | बांधकाम<br>(चौ.फुट. रु.)<br>अ. क्षेत्रफळ<br>ब. बांधकाम खर्च | | | 1.सिमेंट...............नग<br>2.वाळू................ब्रास<br>3.स्टील..............किलो<br>4.पत्रे...........किलो/ नग<br>5.खडी,मुरूम........ब्रास<br>6.इत्यादी | | |
| 2. | साहित्याची यादी तपशीलासह (नग)<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | | | उदा.<br>फर्निचर....................<br>कम्पुटर..................<br>प्रिंटर........................<br>इत्यादी साहित्य | | |
| **एकूण** | | | | | | |

**इ) इतर नाविन्यपुर्ण प्रकल्प** (उदा. क्रश सॅन्ड तयार करणे, सुवर्णलंकार तयार करणे इ.)

| अ. क्र. | बाब | प्रस्तावित करण्यात आलेल्या सुविधा | मोका तपासणी वेळी प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधा | साहित्याचा तपशील | प्रत्यक्षात झालेला खर्च रु. | अनुदानास पात्र खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | बांधकाम<br>(चौ.फुट. रु.)<br>अ. क्षेत्रफळ<br>ब. बांधकाम खर्च | | | 1.सिमेंट...............नग<br>2.वाळू................ब्रास<br>3.स्टील..............किलो<br>4.पत्रे...........किलो/ नग<br>5.खडी,मुरूम........ब्रास<br>6.इत्यादी | | |
| 2. | साहित्याची यादी तपशीलासह (नग)<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड. | | | उदा.<br>फर्निचर....................<br>कम्पुटर..................<br>प्रिंटर........................<br>इत्यादी साहित्य | | |
| **एकूण** | | | | | | |

**प्रकल्पासाठी स्वनिधीतुन खरेदी केलेल्या साहित्याचा तपशील**

| अ. क्र. | पुरवठादाराचे नाव | देयक नं. | दिनांक | साहित्याचा तपशील | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | एकूण | | | | |

11. प्रकल्पाद्वारे होणारी रोजगार निर्मिती (मनुष्य दिन)

| प्रकार | कायम संख्या | | हंगामी संख्या | | एकूण रोजगार निर्मिती | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष | स्त्री | पुरूष |
| | | | | | | |
| | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, ------------------------------------------------------
____________________पो________.तालुका.........................................जिल्हा................................ ..............यांनी अटल अर्थसहाय्य योजनेतंर्गत (कृषि/ बिगर कृषि आधारीत )...............................................................................................या प्रस्तावांच्या अनुषंगाने प्रकल्पाची प्रत्यक्ष स्थळ तपासणी दि.....................................रोजी केली असता सदरच्या प्रकल्पाचे काम सुरू आहे/ पुर्ण झालेले असून दि.............................पासून कार्यान्वीत होणार / झालेला आहे. त्या करीता उभारण्यात आलेल्या सुविधा सन............................मध्ये उभारण्यात येत आहेत / आलेल्या आहेत. त्याचा सविस्तर तपशील वरील प्रमाणे असून प्रकल्पाच्या किंमतीबाबत प्रत्यक्ष बिलावरून / इतर लेखा विषयक दस्तऐवजावरून खात्री करण्यात आलेली आहे. सबब उपरोक्त संस्थेस वरील सुविधासाठी आतापर्यंत रु......................लाख भांडवली खर्च आलेला असून योजनेच्या मापदंडाप्रमाणे रक्कम रू..................लाख (अक्षरी ........................................................................................) एवढे कर्ज रक्कम वितरीत करणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**तपासणी करणा-या शासकीय अधिकारी / कर्मचा-याचे नाव, पदनाम व स्वाक्षरीचा तपशील**

| अ.क्रं. | तपासणी अधिकारी/कर्मचा-याचे नाव | पदनाम | कार्यालय | दिनांक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |

**दिनांक:**

**स्वाक्षरी /-**
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था ____________**

**सही व शिक्का**